सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील( MMRDA) इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑन लाईन पद्धतीने करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- एचएससी १७०९/(४४/०९)/उमाशि- १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २००९

वाचा :

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक - एचएससी १०९७/ (१४४४/९७)/ उमाशि-१, दिनांक २६.६.१९९७
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक- एचएससी १०९७/ (१४४४/९७)/उमाशि-१, दिनांक १०.७.१९९७
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक- एसएसएन २१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७.५.२००३
४) शासन निर्णय क्रमांक- शालेय शिक्षण विभाग क्रमांक-एचएससी १७०३/(२८९/०३)/ उमाशि १, दिनांक ३.७.२००३
५) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- एसएसएन १००४/(२२०/०४)/ माशि-२ दिनांक १८.२.२००५
६) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- एचएससी १७०५/ ८९९०/ (२९७/०५)/ उमाशि-१, दिनांक ३.१०.२००५
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक- एचएससी १७०७/(२२२/०७)/ उमाशि-१, दिनांक २६.६.२००८
८) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे पत्र क्रमांक- ए-१३/शिउसं/उमाशि/ऑ.प्र./०९-१०/ १०१२-१७, दिनांक १४.५.२००९
९) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे पत्र क्रमांक- ए-१३/शिउसं/उमाशि/ऑ.प्र./२००९/ १०६१-६४, दिनांक १८.५.२००९

**प्रस्तावना :** शासन निर्णय क्रमांक- एचएससी१०६७/(१४४४/९७)/उमाशि-१, दिनाक २६ जून, १९९७ अन्वये सन १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून गुणवत्तेच्या आधारावर इयत्ता ११ वी प्रवेशाची कार्यवाही सुरु आहे. या प्रचलित प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्याला प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाचा स्वतंत्र अर्ज घेणे व तो सादर करणे यासाठी बराच वेळ खर्ची पडतो. तसेच एक विद्यार्थी सर्वसाधारणपणे १५ ते २० उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा अर्ज घेऊन तो त्या त्या ठिकाणी सादर करतो. यामुळे विद्यार्थ्याला जादा आर्थिक भार अनाठायी सोसावा लागतो व वेळही वाया जातो. या सर्व अडचणींवर उपाय म्हणून शासनाने सन सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यातील मुंबई महानगर विकास

प्राधिकरण क्षेत्रातील (MMRDA) सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाऑन लाईन प्रवेश प्रक्रियेतूनच प्रवेश घ्यावा लागेल असा निर्णय घेतला आहे.

सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील (MMRDA) इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑन लाईन पद्धतीने करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याकरिता ऑन लाईन पद्धतीने प्रवेश देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्हयातील मुंबई व मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील इयत्ता ११ वीचे प्रवेश ऑन लाईन पद्धतीने करण्याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने विभागांतर्गत अधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. तसेच सदर क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षणतज्ञ, संस्था चालक, अल्पसंख्यांक संस्था चालक,पालक प्रतिनिधी, सी.बी.एस.ई/ आय.सी.एस.ई/ आय.जी.सी.एस.ई./आय.बी. इत्यादी मंडळांच्या शाळांचे प्राचार्य यांच्या सहविचार सभा घेण्यात आल्या. या सभांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या सूचना व मते तसेच ही योजना राबविताना येणाऱ्या अडचणी जाणून घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे मा. लोक प्रतिनिधींची बैठक आयोजित करुन त्यांची मते व सूचना जाणून घेण्यात आल्या आहेत. इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत दरवर्षी पालक व विद्यार्थी यांना होणारा त्रास, खर्च, प्रवेशासाठी द्यावा लागणारा वेळ इत्यादी बाबी टाळण्याच्यादृष्टीने आणि इयत्ता ११ वीचे प्रवेश सुलभ करण्याच्या दृष्टीकोनातून ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-** सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्रातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑन लाईन पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार इयत्ता ११ वीच्या प्रवेशाबाबत उपरोक्त क्षेत्रात ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे. या शासन निर्णयातील तरतूदीव्यतिरिक्त इतर कोणत्याही पद्धतीने इयत्ता ११ वीचे प्रवेश करता येणार नाहीत. या प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी :-

२. उपरोक्त ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे (MKCL ) हया संस्थेची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार या प्रवेश प्रकियेची सर्व तांत्रिक बाजू हे महामंडळ सांभाळणार आहे.

**( अ ) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया :-**

(१) इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना लागू राहील.

(२) )मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य आहे.

(३) प्रवेश प्रक्रियेद्वारे कला, विज्ञान, वाणिज्य, गृहविज्ञान, एच. एस. सी. व्होकेशनल व व्दिलक्षी (Bifocal ) अभ्यासक्रम या शाखांसाठी प्रवेश दिले जातील. तांत्रिक शाखांचे प्रवेश यापूर्वीच्या प्रचलित नियमानुसार व कार्यपध्दतीनुसार होतील.

(४) विदयार्थी आपल्या माध्यमिक शाळेतून, सायबर कॅफेतून, आपल्या स्वत:च्या / मित्राच्या / नातेवाईकांच्या संगणकावरून / महाराष्ट्र शासन पुरस्कृत असलेल्या महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या (MKCL) अधिकृत केंद्र, विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी निश्चित केलेल्या अर्ज स्वीकृती केंद्र (Submission Centers) किंवा नजिकच्या कनिष्ठ महाविद्यालयातून ऑनलाईन आवेदन पत्र भरेल. डाऊन लोड केलेल्या आवेदन पत्राच्या दोन प्रती विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी घोषित केलेल्या अर्ज स्वीकृती केंद्रावर सादर केल्यानंतर विद्यार्थ्यास पोहच मिळेल.

(५) सर्व विद्यार्थ्यांना संकेत स्थळावर अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. हा अर्ज विद्यार्थी एकदाच त्याच्या सोयीने भरु शकेल व त्यासाठी त्याला प्रत्यक्ष उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जाण्याची गरज नाही. प्रवेश अर्ज एकदाच भरावयाचा असल्याने विद्यार्थ्यास १५० पर्यंत प्राध्यान्यक्रम नोंदविता येईल.

(६) ज्या विद्यार्थ्यांना असा प्रवेश अर्ज भरणे शक्य नाही त्यांना सदर प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,पुणे (MKCL) या शासनमान्य संस्थेच्या तांत्रिक साहाय्याने माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, संगणक शिक्षक, लिपिक वर्ग, उच्च माध्यमिक शाळांचे/कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य व त्यांचा शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांच्या सहभागाने आणि सहकार्याने आवेदनपत्र संकेतस्थळावर सादर करता येईल.

(७) मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांसाठी भौगोलिक स्थानानुसार वेगवेगळे झोन करण्यात येतील.

(८) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थी,पालक व इतर संबंधिताना करुन देण्यासाठी शासनस्तरावरुन वृत्तपत्र,दूरदर्शन,केबल इत्यादीवरुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्यात येईल

(९) या प्रवेश प्रक्रियेवर अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सदर प्रक्रियेवर त्यांचे संपूर्ण नियंत्रण राहील. राहील.

(१०) शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे ऑन लाइन प्रवेश प्रक्रियेवर संपूर्ण नियंत्रण राहील.

**(ब ) विद्यार्थी ऑनलाईन प्रवेशासाठी अर्ज कसा सादर करु शकेल :-**

(१) मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) क्षेत्रांतर्गत असलेल्या शाळांमधून इयत्ता १० वी च्या निकालाच्या दिवशी विद्यार्थ्याला त्याची गुणपत्रिका व शाळा सोडल्याच्या दाखल्यासोबत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तिका मराठी वा इंग्रजी रु.१०/- एवढे शुल्क आकारुन उपलब्ध करुन दिली

जाईल. यामध्ये विकल्प फॉर्म, एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा तपशील, अनुदानित / विनाअनुदानित तुकड्या / शाखा निहाय क्षमता त्याचबरोबर प्रवेश अर्ज भरण्यबाबतची माहिती या पुस्तिकेत समाविष्ट असेल. याशिवाय सदरहू सर्व माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांच्या ऑनलाईन प्रवेशासाठी तयार करण्यात आलेल्या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) उपलब्ध करुन दिली जाईल.

(२) मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) क्षेत्रातील कोणत्याही मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी राज्यातील किंवा राज्याबाहेरील कोणत्याही मंडळातून इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश प्रक्रिया लागू राहील.

(३) इयत्ता ११ वीचे प्रवेश मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील एमएमआरडीए क्षेत्राकरिता ऑन लाईन पद्धतीने होणार असल्याने या क्षेत्राचा एक विभाग म्हणून विचार केला जात असल्याने या विभागांतर्गत करावयाच्या प्रवेशासाठी ७० : ३० ही पद्धत लागू राहणार नाही.

(४) विद्यार्थ्याला एकाच वेळी एका प्रवेश अर्जाद्वारे कला / विज्ञान / वाणिज्य / एचएससी व्होकेशनल/होम सायन्स,बायफोकल यापैकी कोणत्याही दोन शाखांसाठी किमान २० ते १५० पर्यंत प्राध्यान्यक्रमाचा विकल्प देता येईल. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यास त्याच्या पसंतीनुसार तीन झोनचा प्राधान्यक्रम द्यावा लागेल.

(५) इयत्ता १० वीच्या निकालापूर्वीच ऑनलाईन प्रवेशाबाबतची संपूर्ण माहिती संबंधित संकेतस्थळावर कार्यान्वित होईल. यावर एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती व विद्यार्थ्यांसाठी विकल्प अर्ज उपलब्ध असेल. विद्यार्थ्याला त्याचा निकाल लागेपर्यंत प्रवेश अर्ज भरता येईल. त्यातील विकल्प भरता येतील, त्यामध्ये बदल करता येतील. मात्र निकाल लागल्याशिवाय तो सादर करता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्याला निकालापूर्वी विकल्प फॉर्म भरण्याचा सराव करता येईल

(६) विद्यार्थ्यांने प्रवेश अर्ज योग्य विकल्प न भरल्यामुळे किंवा पूरेसे विकल्प न दिल्यामुळे संगणकाव्दारे गुणवत्तेनुसार ज्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळेल त्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

(७) विद्यार्थ्याने ऑन लाईन प्रवेशासाठी अर्ज भरल्यावर त्याच्या दोन प्रती डाऊनलोड करुन आवश्यक त्या कागदपत्रासह पडताळणीसाठी सादरीकरण केंद्रावर (Submission centres) सादर करतील. याच केंद्रावर विद्यार्थ्यास रुपये १२५/- शुल्क भरावे लागेल. सादर केलेल्या आवेदन पत्राची व शुल्काची या केंद्रावर पोहच पावती मिळेल.

(८) विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने निश्चित केलेल्या अर्ज स्वीकृती केंद्रावर जमा होणारी रक्कम त्या त्या दिवशी प्रवेश प्रक्रिया नियंत्रण समितीकडे अथवा प्रवेश नियंत्रण समितीने निर्देशित केलेल्या बॅंकेच्या खात्यावर (सुट्टीचा दिवस वगळून) जमा केली जाईल.

(९) प्रक्रिया शुल्क म्हणून विद्यार्थ्यांकडून जमा होणारा निधी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या स्वतंत्र बॅंक खात्यावर जमा करण्यात येईल. या संदर्भात मुंबई विभागीय मंडळाकडून कार्यवाही करण्यात येईल.

**(क ) अल्पसंख्याक/शाळांतर्गत/( In House ) संस्थांतर्गत प्रवेश :-**

(१) अल्पसंख्याक संस्थांच्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयातील अल्पसंख्याकासाठी राखीव असलेल्या जागांकरिता प्रवेश हे संबंधित व्यवस्थापनाने इ. १० वीच्या निकालानंतर सात दिवसाच्या आत शक्यतो पूर्ण करावेत व रिक्त झालेल्या जागा ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित संस्थेने प्रवेश प्रक्रिया समितीस कळवाव्यात.

(२) मा.न्यायालयाचे आदेश लक्षात घेऊन अल्पसंख्याक संस्थाना ५० टक्के व्यवस्थापना कोटा गुणवत्तेनुसार त्यांच्या स्तरावर भरण्याची परवानगी यापुढेही चालू राहील.

(३) सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांना ५ % व्यवस्थापन कोटा स्वेच्छेने गुणवत्तेनुसार भरण्याची परवानगी यापुढेही चालू राहील.

(४) विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रियेत गुणवत्तेनुसार प्रवेश मिळाल्यानंतर त्यांनी विहित मुदतीत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश न घेतल्यास त्यांचा प्रवेशाचा हक्क राहणार नाही. सदर विद्यार्थ्यांस संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश घेण्याची संधी दिली जाईल

(५)शासनाच्या यापूर्वीच्या निर्णयानुसार संस्थांना त्यांच्या माध्यमिक संलग्न उच्च माध्यमिक शाळेसाठी २० टक्के इन हाऊस कोटा राहील.

(६) प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केलेले वैधानिक सामाजिक आरक्षण व इतर आरक्षण प्रचलित शासन निर्णयानुसार लागू राहील.

**(ड ) राज्य व विभागीय मंडळाची जबाबदारी :-**

(१) मार्च २००९ मध्ये प्रविष्ट झालेल्या इयत्ता १० वी च्या विदयार्थ्यांची निकालापूर्वी आणि निकालासह आवश्यक ती माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL), पुणे यांना उपलब्ध करून देईल.

(२) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे कामकाज विहित वेळेत, बिनचूक सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून तसेच सदर प्रक्रियेत कुठलाही व्यत्यय येवू नये यासाठी माहितीची सुरक्षितता राखण्यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL), पुणे व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामध्ये करार करण्यात येईल.

**( ई )शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), पुणे यांची जबाबदारी : -**

(१) इयत्ता ११ वी ऑन लाईन प्रवेश प्रक्रिया संदर्भात सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी -रुपरेषा ठरविणे व या प्रक्रियेचा आढावा घेऊन त्यातील त्रूटी दूर करणे.

(२) इयत्ता ११ वी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती सर्व संबंधित प्राचार्य, विद्यार्थी, पालक यांचेपर्यंत प्रभावीपणे पोहचण्यासंदर्भात आवश्यक ती दक्षता घेणे.

**(फ ) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांची जबाबदारी : -**

(१) विभागीय शिक्षण उपसंचालक , मुंबई हे उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली कॉलेज प्रपत्रामधील माहिती उदा. शाखानिहाय तुकडया, अनुदानित-विना अनुदानित, कायम विना अनुदानित, वर्गनिहाय व शाखानिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता कनिष्ठ महाविद्यालयामध्ये

उपलब्ध असलेले विषय इत्यादी कॉलेज रजिस्ट्रेशन फॉर्ममध्ये नमूद केलेली माहिती तपासून MKCL ला उपलब्ध करुन देतील.

(२) शासन आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेली प्रवेशासंबंधी शासनादेश / परिपत्रके एम.के.सी.एल.ला विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून वेळेत उपलब्ध करुन दिली जातील.

(३) एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रात समावेश असलेल्या गावांचा तसेच उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचा नकाशा विभागीय शिक्षण उपसंचालक ,मुंबई यांच्याकडून एम.के.सी.एल.ला उपलब्ध करुन दिला जाईल.

(४) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडून नियमानुसार निश्चित करुन दिले जाईल.

(५) एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे उद्‌बोधन MKCL च्या मदतीने विभागीय शिक्षण उपसंचालक , मुंबई यांच्यामार्फत पूर्ण करण्यात येईल.

(६) माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक / शिक्षक विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करतील. प्रवेशासंदर्भात संपूर्ण व वस्तुनिष्ठ माहिती असणारी माहिती पुस्तिका तयार करुन ती शाळांना वाटप करतील.

(७) विविध प्रसारमाध्यमातून ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस व्यापक प्रमाणात विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडून प्रसिध्दी देण्यात येईल.

(८) इयत्ता ११ वी ऑन लाईन प्रवेश प्रक्रियाअंमलबजावणी संदर्भात अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे व शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वेळोवेळी अहवाल सादर करतील.

**(ग ) करारनामा :-**

ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेसाठी एम.के.सी.एल. आणि विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचेमध्ये पुढील बाबीसंदर्भात करारनामा करण्यात येईल:-

(१) मुंबई एमएमआरडी क्षेत्रातील इयत्ता ११ वीचे प्रवेशासंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी प्रवेशाबाबत निर्धारित केलेल्या निकषानुसार प्रवेश होण्याच्यादृष्टीने एम.के.सी.एल. आणि विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्यामध्ये करार केला जाईल. यासाठी आवश्यक माहिती मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक एम.के.सी.एल. याना वेळेत उपलब्ध करुन देईल.

**(२)** महाराष्ट्र ज्ञान महामंडळ विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचेकरिता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये संदर्भात स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण करील.

**(३)** या संकेतस्थळावर विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी उपलब्ध करुन दिलेल्या एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविदयालयांची यादी शाखानिहाय व विषयनिहाय तपशीलवार माहिती प्रवेश क्षमतेसह इयत्ता १० वीचा निकाल जाहिर होण्यापूर्वी उपलब्ध करुन देतील.

**(४)** एम.एम.आर.डी. क्षेत्रातील उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयीन प्राचार्यांनी या संदर्भात सर्व आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करावी.

(५)ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील सर्व तांत्रिक बाजूची अचूक अंमलबजावणीची जबाबदारी महाराष्ट्र ज्ञान महामंडळाची राहील.

(६)महाराष्ट्र ज्ञान महामंडळ सर्व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयासाठी आणि विद्यार्थ्यासाठी लॉग इन पासवर्ड उपलब्ध करुन देतील.ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात शाखानिहाय गुणवत्ता यादया तयार करून त्या त्या महाविदयालयाच्या ई-मेलवर स्वतंत्र login (लॉग इन) द्वारे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला (MKCL) उपलब्ध करुन देईल.

(७) विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांनी वेळापत्रकानुसार निश्चित केलेल्या प्रवेश फेऱ्या, विहित कालावधीत पूर्ण करणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला (MKCL) बंधनकारक राहील.

(८)महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने संकेतस्थळावरून महाविद्यालयनिहाय / शाखानिहाय जाहिर केलेल्या गुणवत्ता याद्या संदर्भात भविष्यात उपस्थित होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणाबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक , मुंबई यांना योग्य ती माहिती वेळेत उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

**(ह ) वेळापत्रक : -**

(१) एम. एम. आर. डी. ए. क्षेत्राचा भौगोलिक दृष्टया विचार करता व प्रवेशार्थी विद्यार्थ्यांची संख्या व कनिष्ठ महाविद्यालयांची ठिकाणे, प्रकार व संख्या लक्षात घेता संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३५ दिवसांचा अवधी देण्यात येत आहे.

(२) अल्पसंख्याक संस्थामधील ५० टक्के राखीव जागांसाठी प्रवेश संबंधित संस्था आपल्या स्तरावर देऊ शकेल. मात्र अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर जागा रिक्त राहत असल्यास आणि त्या ऑन लाईन प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्याकरिता संस्थांची अनुमती असल्यास त्या ऑन लाईन प्रवेशाकरिता उपलब्ध करुन दिल्या जाव्यात. तसेच अल्पसंख्याक संस्थेमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना इतरही कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्याची संधी मिळावी यादृष्टीने प्रवेश अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवसापासून पहिल्या सात दिवसात अल्पसंख्याक संस्थेतील प्रवेश, संबंधित संस्था स्तरावर करण्यात यावेत. तथापि संस्थांतर्गत (In-House) २० टक्के प्रवेश व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश ऑन लाईन प्रक्रियेमार्फत अर्ज सादर केल्याच्या अंतिम तारखेनंतर पहिल्या सात दिवसात केले जातील. अल्पसंख्याक वगळता व्होकेशनल आणि संस्थांतर्गत प्रवेश संबंधित विहित निकषानुसार केले जातील.

(३) प्रवेश प्रक्रिया ही रविवार व सार्वजनिक सुटीच्या दिवशीसुध्दा सुरु राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | इ. १०वी चा निकाल लागलेल्या दिवसापासून ७ दिवस | प्रवेश अर्ज सादर करणे. |
| २ | हरकती व त्रूटींची पूर्तता | निकालानंतर ८ व्या, ९ व्या दिवशी |
| ३ | गुणवत्ता याद्या तयार करणे व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना ऑन लाईन पाठवणे - | निकालाच्या १० व्या दिवसापासून पुढील ८ दिवस |
| ४ | पहिल्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश | गुणवत्ता याद्या मिळाल्यापासून ५ दिवस. |
| ५ | पहिल्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यामुळे रिक्त राहिलेल्या जागांचा आढावा घेण्यासाठी | प्रवेश घेण्याच्या शेवटच्या दिवसापासून ३ दिवस |
| ६ | दुसरी गुणवत्ता यादी तयार करणे व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना ऑन लाईन पाठवणे - | पहिल्या यादीतील रिक्त जागांचा तपशिल प्राप्त झाल्यापासून ३ दिवस |
| ७ | दुसऱ्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश | दुसरी गुणवत्ता यादी मिळाल्यापासून ३ दिवस. |

| | | |
|---|---|---|
| ८ | रिक्त राहिलेल्या जागांचा आढावा घेण्यासाठी | दुसऱ्या यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याच्या शेवटच्या दिवसापासून ३ दिवस. |
| ९ | तिसरी गुणवत्ता यादी तयार करणे व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना ऑन लाईन पाठवणे - | दुसऱ्या यादीतील रिक्त जागांचा तपशिल प्राप्त झाल्यापासून २ दिवस |
| १० | तिसऱ्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश | तिसरी गुणवत्ता यादी कनिष्ठ महाविद्यालयांना मिळाल्यापासून २ दिवस. |
| ११ | या प्रवेश प्रक्रियेनंतर प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्याने प्रवेशासाठी मार्गदर्शन म्हणून एम.एम.आर.डी.ए. क्षेत्रातील रिक्त जागा असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयाची शाखानिहाय यादी सर्व केंद्रावर प्रदर्शित करण्यांत येईल. या यादीनुसार प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांनी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाशी परस्पर संपर्क साधून प्रवेश घ्यावा. | जुलै अखेर |

**( ज ) प्रवेश नियंत्रण समिती :-**

ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी मुंबई विभागीय स्तरावर खालीलप्रमाणे प्रवेश नियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई | अध्यक्ष |
| २) वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेल्या एका कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य | कार्याध्यक्ष |
| ३) उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| ४) जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी, मुंबई | सदस्य |
| ५) सर्व शिक्षण निरीक्षक ( उत्तर/दक्षिण/पश्चिम),मुंबई | सदस्य |
| ६) शिक्षणाधिकारी (माध्य ) जि.प. ठाणे व रायगड | सदस्य |
| ७) अवर सचिव , माहिती व तंत्रज्ञान महाराष्ट्र शासन,मुंबई | सदस्य |
| ८) वरिष्ठ महाविद्यालयाला जोडलेल्या एका कनिष्ठ महाविदयालयाचे उपप्राचार्य | सदस्य |
| ९) माध्यमिक शाळेला जोडलेल्या दोन उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक | सदस्य |
| १०)दोन कनिष्ठ महाविद्यालयांतील अध्यापक | सदस्य |
| ११) दोन पालक प्रतिनिधी | सदस्य |
| १२)समाजसेवी संघटनाचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| १३)आय.सी.एस.ई./ सी.बी.एस.ई./एन.आय.ओ./ आय.बी.व इतर बोर्डाच्या शाळांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| १४) सहायक संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक , मुंबई कार्यालय | सदस्य सचिव |

३. समितीतील अशासकीय सदस्यांची नियुक्ती विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यास शासनाची कार्योत्तर मान्यता घ्यावी.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०५२९१९४५००००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अ. मा. भट्टलवार )
शासनाचे सह सचिव

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ), महाराष्ट्र राज्य, पुणे
उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, महापालिका मार्ग, मुंबई
महाव्यवस्थापक, महाराष्ट्र ज्ञान विकास महामंडळ, (MKCL),महापालिका मार्ग, मुंबई,
विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे,
विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभाग, वाशी, नवी मुंबई
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, मुंबई
शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ), जिल्हा परिषद, ठाणे/रायगड
शिक्षण निरीक्षक ( उत्तर/दक्षिण/पश्चिम ), मुंबई
मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील सर्व कार्यासने
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर शासन निर्णयास सर्व प्रसिद्धी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी द्यावी.
निवड नस्ती- उमाशि १